G:\PPG Correspondance \Genral Correspondance Letter(ARW) (Repaired).docx

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

(नॅक समिती तर्फे "अ" दर्जा प्राप्त)


विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४
(महाराष्ट्र) भारत.

दुरध्वणी : (०२४०) २४०३३९९, २४०३४००
कुलसचिव : (का.) २४०३३३३ (नि.) २४००२०३
फॅक्स : (०२४०) २४०३११३, २४०३३३५
तार : बामुसिटी
वेब-साईट : www.bamu.net


दिनांक : २१-१२-२०१६

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/एसएसके/२०१६-१७/ 33542 - 33946

प्रति,
**प्राचार्य / संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय :- COTPA ACT अधिनियम कलम ६ अ / ६ ब ची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपान विरोधी फलक लावणेबाबत.**

**संदर्भ :-** जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र. जिशचि/ रातनिका/ १५९८/ १६ दि. ०५-११-२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने व मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम दि. २५-१०-२०१६ रोजी आयोजित केलेल्या जिल्हा समन्वयक समितीच्या बैठकिमध्ये दिलेल्या निर्देशानुसार सिगारेट व अन्य तंबाखू उत्पादणे नियंत्रण कायदा २००३ कलम ६ अ/ ब नुसार शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिघाच्या आत तंबाखू व अन्य तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन व विक्रिस प्रतिबंधाबाबत निर्देश देणारे फलक महाविद्यालयाच्या प्रवेश द्वारावर लावणेबाबत प्राचार्यांनी अंमलबजावणी करण्यात यावी व फलक लावण्यात आल्याचा संस्थानिहाय छायाचित्रासह अहवाल या कार्यालयास देण्यात यावा. हि विनंती

सोबत :- १) दि.२५-१०-२०१६ रोजी झालेल्या बैठकिचे इतिवृत्त.
२) महाविद्यालयाच्या परिसरामध्ये लावावयाचा फलकाचा नमुना.

आपला विश्वासु,

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

# राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

## जिल्हास्तरीय समन्वय समिती बैठकीचे इतिवृत्त

मा.अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५/१०/२०१६ रोजी राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात दुपारी १२.०० बाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस जिल्हास्तरीय समन्वय समितीचे खालील सदस्य व आमंत्रित उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १)श्री.डी.एस.चव्हाण | उपजिल्हाधिकारी,(राज शिष्टाचार)औरंगाबाद.<br>मा.जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी | अध्यक्ष |
| २) डॉ.अंजली देशपांडे | वैद्यकिय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय,बिडकिन<br>जिल्हा शल्यचिकित्सक,औरंगाबाद<br>जिल्हा सामान्य रुग्णालय,औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य सचिव |
| ३)डॉ.सुहास जगताप | वैद्यकिय अधिकारी म.न.पा.औरंगाबाद | सदस्य |
| ४)श्रीमती.वर्षा ता.रोडे | अन्न सुरक्षा अधिकारी | सदस्य |
| ५)श्री.एस.ए.पोपळघट | विस्तार अधिकारी(आरोग्य)<br>गटविकास अधिकारी,पं.स औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६)श्री.ए.बी.सिरसाठ | सहाय्यक गटविकास अधिकारी<br>गटविकास अधिकारी,पं.स औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७)श्री.अप्पासाहेब उगले | प्रकल्प संचालक मराठवाडा ग्रामीण विकास संस्था | सदस्य |
| ८)श्री.एस.बी.तारके | सहाय्यक जिल्हा माहिती अधिकारी<br>जिल्हा माहिती अधिकारी,औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९) श्री.अरविंद कापसे | शिक्षण विस्तार अधिकारी<br>शिक्षणाधिकारी (माध्य) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०) श्री.एस.आर.कौठाळे | सहाय्यक पोलिस निरिक्षक<br>पोलिस उपआयुक्त (शहर पोलीस) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११) श्री.के.डी.चाटे | पोलिस निरिक्षक (स्थानिक गुन्हे शाखा)<br>पोलिस अधिक्षक (ग्रामीण) यांचे प्रतिनिधी | आमंत्रित |
| १२) श्री.युवराज साळुंखे | ज्युनियर प्रशासकिय अधिकारी<br>सहसंचालक,उच्चशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.यांचे प्रतिनिधी | आमंत्रित |
| १३) डॉ.जी.एन.कुडलीकर | सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.औरंगाबाद.यांचे प्रतिनिधी | आमंत्रित |
| १४) डॉ.सुनंदा सादगी पाटील | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.औरंगाबाद.यांचे प्रतिनिधी | आमंत्रित |

इत्यादी सदस्य व आमंत्रित उपस्थित होते.

डॉ.श्रीमती अंजली देशपांडे (वैद्यकिय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय,विडकिन) सदस्य सचिव जिल्हा समन्वय समिती तथा जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी यांनी तंबाखु नियंत्रण कायदा २००३ व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समिती बैठकीस उपस्थित सर्वांचे स्वागत केले. त्यांनी बैठकीच्या अजेंड्याची माहिती व बैठकीचा उद्देश सांगितला. त्यांनंतर जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रम कक्षातंर्गत केलेल्या कार्याची माहिती दिली.

या बैठकीमध्ये खालील मुददयांवर चर्चा करण्यात आली.

१) मागील बैठकिचे ईतिवृतांत वाचून ईतिवृतांस मंजुरी देण्यात आली.

२) सिगारेट व अन्य तंबाखू उत्पादने नियत्रण कायदा २००३ कलम ६ अ/ब नुसार शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिघाच्या आत तंबाखू व अन्य तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन व विक्रीस प्रतिबंधाबाबत निर्देश देणारे फलक शैक्षणिक संस्थेच्या प्रवेश द्वारावर लावण्यात आलेल्या फलकाचा संस्थानिहाय १०० टक्के अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्यामार्फत प्राप्त झाला आहे. अशाच प्रकारे जिल्हयातील सर्व प्राथमिक शाळा व महाविद्यालयात या कायद्याची काटेखोरपणे अंमलबजावणी व्हावी या करिता शिक्षणाधिकारी प्राथमिक (जिल्हा परिषद,औरंगाबाद), शिक्षणाधिकारी (महानगर पालिका,औरंगाबाद) तसेच कुलसचिव यांना जिल्हा शल्यचिकित्सक यांचे स्वाक्षरीने पत्र देण्यात यावे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षणाधिकारी (महानगर पालिका) यांनी याबाबत जिल्यातील सर्व प्राथमिक शाळेच्या (खाजगी/शासकिय) मुख्याध्यापक व कुलसचिव यांनी सर्व महाविधालयाच्या (खाजगी/शासकिय) प्राचार्यांना या अंतर्गत एक महिन्याच्या आत अमंलबजाबणी करण्यात यावी व सर्व शाळा महाविद्यालयात अशा आशयाचे फलक लावण्यात आल्याचा संस्थानिहाय छायाचित्रासह अहवाल या कार्यालयात देण्यात यावे असे निर्देश द्यावेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व ककुलसचिव यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल याकार्यालयास व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयास देण्यात यावे असे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले

३) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये तालुकास्तरीय समन्वय समिती गठीत करण्याबाबत तसेच तालुका आरोग्य अधिकारी हे तालुकास्तरीय समन्वय समितीचे सदस्य सचिव असल्या करणांने जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांची बैठक आयोजित करुन लवकरात लवकर तालुका स्तरीय समिती गठीत करण्याबाबत निर्देशीत करावे व गठीत केलेल्या समित्याचा अहवाल या कार्यालयास व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास सादर करण्याचे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

४) तालुका स्तरीय समन्वय समिती प्रमाणेच ग्रामस्तरीय समन्वय समिती गठीत करण्या बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या बैठकिमध्ये तालुका आरोग्य अधिकारी यांना निर्देश देण्यात यावे. ग्रामस्तरीय समन्वय समिती मध्ये आशा कार्यकर्ती ही सदस्य सचिव असल्या कारणांने तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा समुह संघटक (राष्ट्रीय आरोग्य अभियान,जिल्हा परिषद,औरंगाबाद) यांनी गट प्रवर्तकांच्या मासिक आढावा बैठकीमध्ये याबाबत गटप्रवर्तकांना ग्रामस्तरीय समिती गठीत करण्याबाबत निर्देशीत करावे व गठीत केलेल्या समित्याचा अहवाल या कार्यालयास व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास सादर करण्याचे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

५) सिगारेट व अन्य तंबाखू उत्पादने कायदा २००३ नुसार दंडाची रक्कम वसुल करण्यासाठी लागणारे चलान पुस्तिका जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने जिल्हा स्तरावर छापून सर्व (समिती सदस्य) यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे व त्याच बरोबर दंडाची रक्कम वसुल करण्याचे Target (उद्देश) देण्यात यावेत. चालान द्वारे जमा होणारी दंडात्मक रक्कम जमेचे लेखाशिर्ष ०२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य,०४-सार्वजनिक आरोग्य,१०४-फी,दंड इत्यादी,०१-फी,दंड इत्यादी,(०१)(०४) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाखालील सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास प्रतिबंध,नियमानुसार दंड वसुल,(संकेतांक -०२१००६७२०१) मध्ये जमा करावी असे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी सर्व सदस्यांना दिले.

६) जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाकडून करण्यात येत असलेल्या जनजागृती कार्यक्रम हे सर्व शासकिय/खाजगी,ग्रामीण/शहरी, माध्यमिक व कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसायीक महाविद्यालयात सुध्दा आयोजित करण्यात यावेत. असे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

७) पुढील जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या त्रैमासिक बैठकिमध्ये अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलिस विभाग यांच्या मार्फत सिगारेट व अन्य तंबाखू उत्पादने कायदा २००३ नुसार ह्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर आता पर्यंत दाखल झालेल्या गुन्ह्याच्या माहितीचा अहवाल अन्न व औषध प्रशासन व पोलिस विभाग यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

८) जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयामार्फत सर्व कृषी मोबाईल कार्ड धारकांना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृतीपर एस.एम.एस चा अंतर्भाव करण्यात यावा. व जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षा मार्फत सदरील संदेश जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयास देण्यात यावेत असे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

९) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांच्या मासिक आढावा बैठकिच्या वेळी सिगारेट व अन्य तंबाखू नियंत्रण कायदा २००३ ची काटेकोर अंमलबजावणी होण्याकरिता शालेय स्तरावर राज्य शासनाच्या मार्गदर्शन सुचनेनुसार एक महिन्याच्या आत शालेय स्तरावर तंबाखू नियंत्रण समिती गठीत करण्यात यांवी असे निर्देश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी या कार्यालयास सादर करावे असे निर्देश बैठकिच्या अध्यक्षांनी दिले.

१०) Juvenile Justice Act च्या कलम ७७ व कलम २ (१२) नुसार अंमलबजावणी होण्याकरिता अन्न व औषध प्रशासन विभागाने शिबिराचे (Campaign) आयोजन करण्यात यावे व आयोजित केलेल्या शिबिराचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावे असे निर्देश बैठकिच्या अध्यक्षांनी देताच अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती.वर्षा रोडे यांनी लवकरात लवकर शिबिराचे आयोजन करुन अहवाल मा.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात येईल असे सांगितले.

११) पुढील जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकिस सहआयुक्त अन्न व औषध प्रशासन विभाग यांना आमंत्रित करावे असे निर्देश बैठकिच्या अध्यक्षांनी दिले.

१२) पुढील जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकिस स्थानक प्रबंधक (रेल्वे विभाग) आगार प्रमुख (मध्यवर्ती बस स्थानक) व कुलसचिव (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ,औरंगाबाद.) यांना पुढील बैठकिस आमंत्रित करावे असे निर्देश बैठकिचे अध्यक्ष यांनी दिले.

बैठकिच्या शेवटी डॉ.अंजली देशपांडे (वैद्यकिय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय,बिडकिन) सदस्य सचिव जिल्हा समन्वय समिती तथा जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय औरंगाबाद यांचे प्रतिनिधी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे सांगण्यात आले.

सदस्य सचिव
जिल्हा समन्वय समिती तथा
जिल्हा शल्यचिकित्सक,सामान्य रुग्णालय,औरंगाबाद.

अध्यक्ष,
जिल्हा समन्वय समिती तथा
जिल्हाधिकारी,औरंगाबाद करीता
उपजिल्हाधिकारी,(शिष्टाचार)औरंगाबाद.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाविद्यालयांना /शैक्षणिक संस्थांना तंबाखू वापरावर नियंत्रण करण्यासाठी सूचना देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११९/(प्र.क्र.६६/१४)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २४ जून, २०१५.

वाचा -

१) केंद्र शासनाचा सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३.
२) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१११९/प्र.क्र.६६/१४/समन्वय, दि.०७/०३/२०१५.

शासन परिपत्रक -

तंबाखूचा वाढता वापर आणि त्याच्या दुष्परिणामांमुळे जागतिक आरोग्य संघटनेने तंबाखूला जागतिक समस्या म्हणून घोषित केले आहे. जगामध्ये प्रत्येक वर्षी ५० लक्ष व भारतात अंदाजे १० लक्ष लोक तंबाखूमुळे होणाऱ्या आजारांनी मृत्यूमुखी पडतात. हृदयरोग, फुफ्फुसाचे आजार तसेच इतर असंसर्गजन्य रोगांचे कारण तंबाखूचा वापर आहे. लहान वयात तंबाखूची सवय लागल्याने ही सवय सोडणे कठीण जाते व यामुळे विविध असंसर्गजन्य आजार होण्याचा धोका असतो. शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण हा चिंतेचा विषय आहे.

२. तंबाखू वापरावर प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा Cigarettes and Other Tobacco Products ( Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution ) Act, 2003 तयार केला आहे. शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थी तंबाखूचे व्यसनांच्या विळख्यात सापडू नयेत यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तंबाखू नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३. **तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ ची महत्वाची कलमे खालीलप्रमाणे आहेत. :-**

कलम ४ – शैक्षणिक संस्थांसह सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी आहे.

कलम ६(अ) – तंबाखूविक्री लहान मुलांना आणि लहान मुलांकडून करून घेण्यास बंदी आहे.

कलम ६ (ब) – शैक्षणिक संस्थांपासून १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे व तसे शाळेच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक आहे.

वरील नियमांचे पालन न केल्यास रु. २००/- पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

४. याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील प्रत्येक महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेला खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात येत आहे. –

१) खाली देण्यात आलेल्या नमुन्यात महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेत धुम्रपान बंदीबाबत सूचना फलक लावण्यात यावा.

**सूचना चिन्हांचा तपशील -**

अ) महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर आणि प्रत्येक मजल्यावर, जिन्यासह तसेच प्रत्येक मजल्यावरील लिफ्टच्या प्रवेशद्वारावर पुढीलप्रमाणे फलक लावण्यात यावेत. :-




ब) महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेमध्ये ज्यांच्याकडे तक्रार करावयाची आहे, त्या संबंधित व्यक्तीचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे नमूद करावा. :

> तुम्हाला कुणी धूम्रपान करताना, तंबाखू खाताना दिसल्यास सूचना द्या
>
> नावः...............................................
>
> पदः ...........................................
>
> दूरध्वनी...........................................

२) महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेपासून १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंदीबाबतचे फलक खाली दिलेल्या नमुन्यात महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेच्या प्रवेशद्वारावर लावावेत.

> **तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था**
>
> या शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने विकण्यास बंदी आहे आणि तो २०० रुपये (दोनशे रुपये) दंडासह शिक्षापात्र गुन्हा आहे.
>
> आदेशानुसार

३) महाविद्यालय /शैक्षणिक संस्था प्रमुखांनी खालीलप्रमाणे स्वाक्षरी केलेले घोषणापत्र फोटोसहित संबंधित शिक्षण संचालकांना पाठवावेत.

" ( महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेचे नांव, पत्ता ) मध्ये कुठल्याही तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन होत नाही व तसेच महाविद्यालयाच्या/शैक्षणिक संस्थेच्या आवारात कुठलेही तंबाखूजन्य पदार्थ उपलब्ध नाहीत. आम्ही सिगारेट/ बिडीचे अवशेष व तसेच तंबाखू खाऊन थुंकणे याबाबतीत महाविद्यालय/संस्थेच्या आवारात तपासणी केली असता आम्हाला सदर गोष्टी आढळून आल्या नाहीत. "

४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालय /शैक्षणिक संस्थांनी काटेकोरपणे वरीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१० जुलै, २०१५ पर्यंत संबंधित शिक्षण संचालकांना पाठवावा व संबंधित संचालकांनी आपला अहवाल दि.१५ जुलै, २०१५ पर्यंत शासनास सादर करावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०६२४१६२८१५७८०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

का.रा.पिळणकर
( कार्यासन अधिकारी)

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व संचालकांना विनंती की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणावे.
११. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

१२.सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण.
१३.सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, तंत्र शिक्षण.
१४.सर्व विभागीय उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण.
१५.सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.डॉ. रुपेश महाजन, सल्लागार, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१७. निवडनस्ती.